Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 15 October 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १५ ऑक्टोबर २०२५ सकाळी ११.०० वाजता

****

भारताचे माजी राष्ट्रपती आणि 'मिसाईल मॅन' म्हणून ओळखले जाणारे भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती आज वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी होत आहे. विज्ञान, शिक्षण आणि राष्ट्रसेवेसाठी कलाम यांची निःस्वार्थ निष्ठा आजही अनेक पिढ्यांना प्रेरणा देते. कलाम यांनी भारताच्या अंतराळ आणि क्षेपणास्त्र विकास कार्यक्रमात मोलाची कामगिरी बजावली, तसंच १९९८ मधल्या पोखरण-२ अणू चाचणीमध्येही त्यांचा महत्वपूर्ण सहभाग होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दृश्यफितीद्वारे कलाम यांना आदरांजली वाहिली, तर केंद्रीय मंत्री अमित शाह यांनीही त्यांच्या राष्ट्रनिष्ठा आणि विज्ञान, तंत्रज्ञान, संरक्षणातील योगदानाबद्दल गौरव व्यक्त केला.

दरम्यान, वाचन प्रेरणा दिनानिमित्त आज छत्रपती संभाजीनगर इथं मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीनं कविसंमेलनाचं आयोजन करण्यात आलं आहे.

****

भारताची वर्ष २०२६ ते २०२८ या कार्यकाळासाठी संयुक्त राष्ट्र मानवाधिकार परिषदेवर पुन्हा निवड झाली आहे. ही भारताची सातवी निवड ठरली असून, मानवाधिकार आणि मूलभूत स्वातंत्र्यांविषयीच्या भारताच्या ठाम वचनबद्धतेचं हे प्रतीक मानलं जात आहे. भारताने या निवडीसाठी पाठिंबा दिलेल्या सर्व देशांचे आणि संयुक्त राष्ट्रांचे आभार मानले असून, मानवाधिकारांच्या संरक्षण आणि प्रोत्साहनासाठी आपल्या कार्यकाळात सक्रियपणे कार्य करण्याची ग्वाही दिली आहे.

****

पंतप्रधान आणि भाजपचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी आज बिहार विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची सुरुवात करणार आहेत. मेरा बूथ सबसे मजबूत मोहिमेअंतर्गत बिहारमधल्या भाजपच्या बूथ स्तरावरील कार्यकर्त्यांशी ते संवाद साधणार आहेत. दरम्यान, या निवडणुकीसाठी भाजपने काल ७१ उमेदवारांची पहिली यादी जाहिर केली.

****

कॅनडाच्या परराष्ट्र व्यवहार मंत्री अनिता आनंद यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळानं काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची 'वर्षा' निवासस्थानी भेट घेतली. या भेटीत तंत्रज्ञान, शिक्षण, वित्त, व्यापार, गुंतवणूक आणि उद्योग क्षेत्रातलं सहकार्य आणि विकासाच्या संधींवर सविस्तर चर्चा झाली. कॅनडा आणि भारत यांच्यात मैत्रीपूर्ण संबंध अधिक दृढ होत असून, या पार्श्वभूमीवर कॅनडातील उद्योजक आणि गुंतवणूकदारांसाठी महाराष्ट्रातील संधी सहकार्याच्या नव्या उंची गाठतील, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. भारताच्या वेगवान आर्थिक प्रगतीत कॅनडानं भागीदार व्हावं, असं आवाहन त्यांनी केलं.

****

पूरस्थिती लक्षात घेता राज्यात मोठ्या प्रमाणावर वाळूची आवश्यकता भासणार असल्यानं, वाळू घाटांचे लिलाव वेळेत पूर्ण करण्याचे आदेश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत. काल यासंदर्भातल्या बैठकीत वाळू धोरण आणि वाळू घाटांची स्थिती याचा सविस्तर आढावा घेण्यात आला. लिलाव प्रक्रियेत विलंब झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. राज्यात कोणत्याही परिस्थितीत वाळू टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी तत्काळ कार्यवाही करावी, असे निर्देशही बावनकुळे यांनी दिले.

****

बालविवाहमुक्त महाराष्ट्र घडवण्यासाठी वैयक्तिक स्तरावर प्रबोधन आणि जनजागृतीपर विशेष अभियान राबवण्याचे निर्देश महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले. 'बालविवाहमुक्त महाराष्ट्रासाठी १०० दिवस' या अभियानाच्या आढावा बैठकीत त्या काल बोलत होत्या. जिल्हा परिषद आणि माध्यमिक शाळांमधल्या मुलींचं शाळा सोडण्याचं प्रमाण कमी करण्यासाठी तसंच लैंगिक शिक्षणाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी विभागीय पातळीवर विशेष उपक्रम राबवण्यात यावेत, असं त्यांनी सांगितलं.

****

भारतीय कापूस महासंघाच्या माध्यमातून राज्यात कापूस खरेदीसाठी शेतकऱ्यांची `किसान कपास ॲप` वर नोंदणी सुरू झाली आहे. ही नोंदणी अधिक सुलभ आणि जलद गतीने होण्यासाठी कृषी विभागाकडील `ॲग्रीस्टॅक पोर्टल` ची आधार संलग्न माहिती उपयोगात आणावी, असे निर्देश पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिले आहेत. कृषी आणि पणन या दोन्ही विभागांनी समन्वय करून कापूस खरेदीची प्रक्रिया शेतकरीभीमुख, सुलभ आणि जलदगतीने करण्याठी नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले असून, शेतकऱ्यांना कुठलीही अडचण येऊ नये, याची काळजी घ्यावी, अशी सूचनाही रावल यांनी केली.

****

परभणी जिल्ह्यातल्या गाव आणि पाड्यांना पाणीपुरवठा सुरळीत, नियमित आणि गुणवत्तापूर्ण व्हावा, यासाठी आवश्यक ती सर्व कामं वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करावीत, अशा सूचना पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनी दिल्या आहेत. यासंदर्भातल्या आढावा बैठकीत जलजीवन मिशन, जिल्हा परिषद आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाअंतर्गत राबवण्यात आलेल्या योजनांचा आढावा घेण्यात आला. वस्सा, आडगाव, आसेगाव, दुधगाव या गावांमध्ये योजनांना फेरमान्यता देण्याबाबतही बोर्डीकर यांनी निर्देश दिले.

****

नांदेड जिल्ह्यात भोकर इथल्या दिगंबरराव बिंदू महाविद्यालयात आज पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात नामांकित उद्योजक, शैक्षणिक संस्था तसंच इतर आस्थापनांच्या विविध रिक्त जागांसाठी मुलाखती घेण्यात येणार आहेत.

****